रे.क.नं. ४९/२०२० मधील निशाणी २१ वरील आदेश

१. वादींनी सदरचा अर्ज कोर्ट कमिश्नर यांची नेमणूक करुन उसाचे पिक तोडून वाहतूक करुन साखर कारखान्यास पाठवून तसा पंचनामा, नकाशा व रिपोर्ट सादर करणेबाबत दाखल केला आहे.

२. वादीचे अर्जातील असे कथन आहे की, त्याने प्रतिवादी विरुद्ध कायम मनाई मिळणेसाठी दावा दाखलकेला आहे. दिनांक ३०.०४.१९८० रोजी वादीने नोंद खरेदीप्रत्राने रक्कम रुपये पाच हजारचे मोबदलेत प्रतिवादी क्र १ व २ यांचे वडिलांकडुन वाद मिळकत चतुसिमा पुर्वक नोकरीचे पैश्याच्या उत्पनातुन खरेदी केली आहे. त्यामध्ये वादीने ९२००५ जातीचे उसाचे पिक घेतले असून सदरचे पिक तोडणीकरुन साखर कारखाण्यास पाठविण्यास तयार झाले आहे. सदरमिळकतीशी प्रतिवादीयांचा संबंध नसताना प्रतिवादी वादीस हरकत अडथळा करीत आहेत.

३. दिनांक ०८.०२.२०२१ रोजी प्रतिवादी क्र ३ हिने आथणी शुगर मिल्स लि. भुदरगड यांचे मजुरांना व ट्रक ड्रायव्हर यांना शिवीगाळ करुन तोडलेले उसाचे पिक घेवून जावू दिले नाही. तशी फिर्याद वादीने दिनांक ०८.०२.२०२१ रोजी पोलीस ठाणे आजरा येथे दाखल केली आहे. परंतू पोलीसांनी कोणतेही कार्यवाही केली नाही. तुटलेला उस उन्हामध्ये पडलेला असलेने वादीचे फार मोठे नुकसान होणार आहे. सबब, दावामिळकती मधील तुटलेले उसाचे पिक व सदर दावामिळकतीत उभे असलेले उसाचे पिक हे तोडुन ती वाहतुक करुन त्यामधुन आलेली रक्कम कोर्टात जमा करण्यासाठी तसाच त्याबाबतचा वस्तू स्थिती प्रमाणे पंचनामा व नकाशा तयार करुन रिपोर्ट सादर करण्यासाठी विनंती

केली आहे.

४. प्रतिवादी क्र ३ यांनी वादीच्या अर्जातील सर्व कथने नाकारली आहेत. प्रतिवादी क्र ३ चे असे कथन आहे की, तिने वादीने दावादाखल करण्यापुर्वी रे.क.नं ३५/२०२० हा हक्कज्ञापन व मनाईचा दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ३ च्या कथनाप्रमाणे वादीहा सन १९६५–१९८२ या काळात मुंबई येथे कापड गिरणीत कामाला होता. त्यानंतर सन १९८२–१९९५ पर्यंत तीन भावांचे व्यवहार एकत्र कुटुंब प्रमुख म्हणून पाहत होता. सदरची दावामिळकत वादीच्या नावे तुकाराम म्हणजे प्रतिवादी क्र ३ चे पती यांनी नोकरीच्या उत्पन्नातुन खरेदी केली तसेच होनेवाडी येथिल जमीन गट नं. १० ही देखिल सर्व कुटुंबासाठी वादीकडे पैसे देवुन वादीच्या नावे खरेदी केली.

५. रे.क.नं. ३५/२०२० हा दावा हक्कज्ञापनाचा दाखल केला असुन गट नं १८६ मध्ये प्रतिवादी क्र. ३ व ४ यांचे पुर्व हक्कदार तुकाराम व त्यानंतर त्याचे वारस १/३ हिश्याला मालक असुन तशी नोंद ७/१२ पत्रकी होण्याची मागणी केली आहे. विठोबा तुकाराम व शिवाजी यांनी त्यांच्या सहीचे वाटपाचे टिपन लिहुन ठेवले असुन त्याप्रमाणे वादी, प्रतिवादी क्र.३ व शिवाजी असे प्रत्येकी १२ आर. क्षेत्र वहिवाट करीत असुन प्रतिवादी क्र.३ हिने गेल्या हंगामात तिच्या क्षेत्रात उस केला होता. व तो उस ओलम साखर कारखाना राजगोळी ता. चंदगड येथे ९ टन पाठविला होता. व त्याचे उसबिल महाराष्ट्र बँकेच्या खात्यावरुन प्रतिवादी क्र. ३ ला मिळाले आहे. वादी हा जमीनाचा एकटा मालक नसल्याने प्रतिवादी क्र.३ हिने हरकत केल्याने सदरचा खोटा अर्ज वादीने दाखल केला असल्याने तो नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

६. वादीचे असे कथन आहे की, त्याने दावामिळकत प्रतिवादी क्र १ व २ यांचे वडील यांचेकडुन खरेदी घेतली आहे. त्याकरीता वादीतर्फे खरेदीपत्राची प्रमाणित प्रत दाखल करण्यात आली आहे. सदर खरेदीपत्राच्या अवलोकनावरुन असे निदर्शणास येते की, खरेदी घेणार म्हणून वादीचे एकटयाचे नाव नमुद आहे.

७. प्रतिवादी क्र. ३ चे असे कथन आहे की, वादीला जमीन खरेदी करण्यासाठी तुकाराम यांनी नोकरीच्या उत्पन्नातुन आलेले पैसे दिले होते. त्यामुळे त्यांनी रे.क.नं. ३५/२०२० हक्कज्ञापनाचा व मनाईचा दाखल केला आहे. तसेच प्रतिवादी क्र. ३ चे असे कथन आहे की, विठोबा तुकाराम व शिवाजी यांच्या सहीने वाटपाचे टिपन लिहुन ठेवले आहे.

८. अभिलेखावरील नोंदणीकृत खरेदीपत्र व अभिलेखावर दाखल असलेले ७/१२ उतारे पाहता वादी हा एकटा मालक असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते अशा परिस्थित तुकाराम यांनी वादीस सदर मिळकत एकत्र कुटुंबा करीता खरेदी देणेसाठी पैसे दिले होते किंवा काय ही बाब अभिलेखावर पुरावा आल्यानंतर सिद्ध होणार आहे. सदरची बाब सिद्ध होण्यास बराच कालावधी लागणार आहे. अशा परिस्थितीत दावामिळकतीमधील उस तसाच पडुन राहिला तर वादीचे आर्थिक नुकसान होणार आहे. तसेच वादीच्या अर्जातील कथनावरुन देखिल असे निदर्शनास येते की, वादीने उसाची येणारी रक्कम ही न्यायालयात जमा करण्याची विनंती केली आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र ३ चे नुकसान होण्याचे कोणतेही कारण नाही. सबब, वर नमुद सर्व कारणास्तव व कागदोपत्री पुराव्यावरुन वादीचा अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. सबब, खालिलप्रमाणे आदेश पारीत

करण्यात येत आहे.

आदेश

१. वादीचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. कोर्ट कमिशनर म्हणुन विधीज्ञ श्री. एस. एस. इंजल यांची नेमणूक करण्यात येते.

३. कोर्ट कमिशनर यांनी दावामिळकती मधील उस त्यांच्या देखरेकीखाली कारखान्यास पाठविण्याचा आहे. व त्यामधुन येणारी रक्कम न्यायालयात जमा करणेची आहे. तसेच स्वयंमपुर्ण असा अहवाल दाखल करण्याचा आहे.

४. वादी यांनी कोर्ट कमिशनर यांची कमिशन फि रक्कम रु. ३०००/– न्यायालयात जमा करणेची आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Dhananjay Tatyasaheb Patil
Date: 2021.02.25 17:19:51 +0530

दिनांक – २३.०२.२०२१

(ध. ता. पाटील)

दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

आजरा